# एका गुलाम मुलीने भिन्न संस्कृतीतील आपल्या धन्याची मदत केली आपल्यापेक्षा वेगळया लोकांवर प्रीती करण्यास मुलांना शिकवा.

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, मुलांनी त्यांच्यापेक्षा वेगळ्या लोकांवर, यामध्ये आंधळे, बहिरे आणि भिन्न संस्कृतीतील लोकही आले, प्रेम करावे यासाठी कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे.''*

*मुलांचे वय, समजबुध्दी आणि गरजा ह्यांना योग्य अशा शैक्षणिक कृतींची निवड करा.*

*नामानाविषयी शिकवण्याची तयारी* **२ राजे ५:१-१६** *हा शास्त्रभाग वाचून करा. नामान हा प्राचीन आरामाच्या (सिरियन) सैन्याचा सेनापती होता. त्याला कोड झाले होते. हा वृत्तांत, एक लहान मुलीने आपल्या धन्याला त्याच्यावर देवाची प्रीती आहे हे ओळखण्यास कशी मदत केली ते सांगतो.*



*मोठ्या मुलांनी हा वृत्तांत वाचावा किंवा लक्षात ठेवून सांगावा. मग पुढील प्रश्न विचारा. (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे दिलेली आहेत.)*

- *नामान कोण होता आणि त्याला कोणता आजार झाला होता? (पाहा वचन १)*
- *इस्राएली मुलगी आरामी कुटुंबाबरोबर का राहात होती? (पाहा वचन २)*
- *ती मुलगी गुलाम असूनही आपल्या धन्याबद्दलचे प्रेम कशा प्रकारे व्यक्त केले? (पाहा वचन ३)*
- *बरे होण्यासाठी अलीशाने नामानाला काय करण्याची सूचना केली? (वचन १०)*
- *अलीशाची सूचना ऐकून नामानाला काय वाटले? (वचन ११)*
- *अलीशाकडून कशा प्रकारच्या वागणूकीची अपेक्षा नामानाने केली होती? (वचन ११. नामान ही श्रीमंत व महत्वाची व्यक्ती असल्यामुळे अलीशा एखादा प्रभावी अद्भुत चमत्कार करील असे नामानाल वाटले.)*
- *संदेष्ट्याची सूचना पाळण्यास नामानाला कोणी भाग पाडले? (वचन १३)*
- *नामानाला बरे केल्याबद्दल अलीशाने एकही पैसा घेतला नाही याचे कारण काय? (वचन १६. नामान श्रीमंत वा महत्वाची व्यक्ती होती म्हणून नाही तर त्याने देवावर विश्वास ठेवून आज्ञापालन केले म्हणून देवाने त्याला आरोग्य दिले हे अलीशाला त्याला शिकवायचे होते.)*

*नामानाला आरोग्य मिळते ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा. तुम्हांला वाटल्यास यातील फक्त काही भागच घ्या.*

- *हे नाट्यीकरण मुलांना सादर करता यावे यासाठी उपासनेच्या मुख्य पुढाऱ्याशी चर्चा करून वेळ ठरवा.*
- *मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करून द्यावी.*
- *मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी मुलगी, पत्नी, नामान, गेहजी, इस्राएलचा राजा, अलीशा व निवेदक ह्या भूमिका कराव्यात. नामानाच्या हातात कागदाचा तुकडा असतो.*
- *लहान मुलांना* **नामानाच्या सेवकांची** *भूमिका करायला द्या.*

**निवेदक:** *२ राजे ५:१-१६ ह्या शास्त्रभागातून वृत्तांत सांगून मग म्हणा, ''आता गुलाम म्हणून आणलेली मुलगी नामानाच्या पत्नीला काय म्हणते ते ऐका.''*

**मुलगी:** *''बाईसाहेब, माझे धनी नामान ह्यांना कोड झाल्यामुळे ते फार दु:खी आहेत. त्यांना मदत करायची माझी इच्छा आहे. कृपया करून त्यांना इस्राएलमधील देवाच्या संदेष्ट्याची जाऊन भेट घेण्यास सांग.''*

**पत्नी:** *नामानाकडे जाऊन म्हणा, ''अहो, तुम्ही एवढे उपचार घेतले, सर्व औषधपाणी केले. तर आता इस्राएलमधील संदेष्ट्याचा जाऊन शोध घ्या. कदाचित तो तुम्हांला बरे करील!''*

**नामान:** *''मी आपल्या आरामाच्या राजाला अशी विनंती करणारे पत्र लिहिण्यास सांगेन.'' (तुमच्या सेवकांसह राजाकडे जा. त्याच्यासमोर गुडघे टेकून बसा आणि त्याच्या हातात कागद द्या.) मग म्हणा, ''इस्राएलाचा राजा चिरायू होवो! कृपा करून माझ्या आरामाच्या राजाचे हे विनंती पत्र वाचा. माझे कोड बरे करू शकेल असा संदेष्टा कोठे आहे तेवढे मला सांगा.''*

**इस्राएलाचा राजा:** *''तुझे कोड बरे करायला मी काय देव आहे का? तुझा राजा माझ्याशी काहीतरी भांडण उकरून काढू पाहात आहे!''*

**नामान व सेवक:** *माना खाली घालून उदासपणे निघून जा. सेवक आपसात म्हणतात, ''अरेरे वाईट झाले!'' ''हा असा वाईट आजार कोणालाच बरा करता येणार नाही.''*

**गेहजी:** *नामानाकडे जाऊन गुडघे टेकून म्हणा, ''सेनापती नामान, माझा धनी अलीशा संदेष्टा आहे, तो तुम्हांला एकाच खऱ्या देवाचे सामर्थ्य दाखविल. येऊन त्याला भेटा!''*

**नामान:** *तुमच्या सेवकांना म्हणा, ''चला आता आपल्याला कोणीतरी महान सामर्थ्याचा उपयोग करीत असल्याचे पहायला मिळेल, कारण मी एक सामर्थ्यशाली मनुष्य असून यासाठी कितीही पैसे मोजायची माझी तयारी आहे!''*

**गेहजी:** *''नामान, माझ्या धन्याने तुम्हांला निरोप दिला आहे की तुम्ही जाऊन यार्देन नदीत सात वेळा आंघोळ करावी.''*

**नामान:** *(रागाने) ''अजिबात नाही! मी त्या घाणेरड्या नदीत आंघोळ मुळीच करणार नाही! त्यापेक्षा आमच्या नद्या स्वच्छ आहेत!''*

**सेवक:** *असे म्हणा, ''त्याने एखादी अवघड गोष्ट करायला सांगितली असती तर तुम्ही केली असती ना!'' ''कृपा करून जा'' ''देवाचा संदेष्टा सांगतो त्याप्रमाणे कृपा करून करा!''*

**नामान:** *नदीमध्ये सात वेळा बुडी मारल्याचा अभिनय करा.*

**सेवक:** *असे म्हणा. ''पाहा पाहा! महाराजांचे कोड नाहीसे झाले!'' ''ते पूर्णपणे बरे झाले!''*

**नामान:** *अलीशाकडे जाऊन म्हणा, ''ह्या महान अद्‌भुत चमत्कारासाठी मी तुला चांगली किंमत देईन!''*

**अलीशा:** *''नको! देवाला पैशांची आवश्यकता नाही. एकच खरा देव कोण आहे हे दाखवण्यासाठी त्याने तुला आरोग्य दिले.''*

**नामान:** *त्या मुलीकडे जा तिच्यासमोर डोके लववून उभे राहून म्हणा, ''बाळा, खूप खूप धन्यवाद, तुझ्यामुळे माझी एकाच खऱ्या देवाशी ओळख झाली. मी तुला गुलाम म्हणून तुझ्या देशातून इकडे आणले तरी तू माझी काळजी घेतलीस.''*

**निवेदक:** *नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना. लोकांनी नाटिका शांतपणे पाहिल्याबद्दल त्यांना धन्यवाद द्या.*

**प्रश्न:** *मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठ्या माणसांना विचारावेत.*

**चित्र काढा:** *मुलांना नदीवर आंघोळ करणाऱ्या माणसाचे चित्र काढायला सांगा.*

- *मुलांनी काढलेले चित्र ते उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवतील.*
- *देव लहान मुलांच्या प्रेमाचा उपयोग करून घेऊन तो आरोग्य देतो आणि पापांची क्षमा करतो हे लोकांना सांगतो, हेच या चित्रावरून दिसते असे मुलांना स्पष्ट करायला सांगा.*

**चर्चा करा.** *आपल्यापेक्षा वेगळे लोक कोण आहे, त्यांच्यावर प्रेम करून त्यांच्यामध्ये आपल्याला सेवा करता येईल याची उदाहरणे मुलांना विचारा.*

**कविता:** *तीन मुलांना ईयोब ४२:१-६ या शास्त्रभागातील प्रत्येकी दोन वचने म्हणायला सांगा.*

*सर्व राष्ट्रांतील लोकांवर देवाची प्रीती आहे ही स्तोत्र ६७ मधील कल्पना किंवा त्यातील शब्द घेऊन मोठ्या मुलांना कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा. आठवडाभरात ते हे काम करतील.*

**पाठ करा.** *स्तोत्र ६७:२-३*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, आमच्यापेक्षा वेगळे असणाऱ्या लोकांवर आम्ही प्रेम करावे यासाठी तू आमचे साहाय्य कर. आंधळे, बहिरे आणि इतर संस्कृती व धर्मातील लोकांवर प्रेम करण्यास आमचे साहाय्य कर.''*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net